म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणें
विषय बा.वा
दा. क्र. ६२३८

IRBK-0106238




म. ग्रं. सं. ठाणे
विषय
वा. नं. ७७५

दा. क्र.
६२३८

नवसाक्षरांसाठीं सामान्यज्ञान : १ :

# कोण काय करतो?

२१४३६०
विभाग ७०५
क्रमांक ७३/३/४६०
नों. दि.

• • •

शं. रा. देवळे
वि. न. गोंधळेकर

६२३८
बा : ९१

किंमत

IRBK-0106238

चित्रशाळा प्रकाशन, पुणें २.

मुद्रक व प्रकाशक
दा. त्र्यं. जोशी,
(बी. ए.)
चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव पेठ
पुणें २.

• • •

सर्व हक्क स्वाधीन

• • •

आवृत्ति पहिली
१९५७

• • •

चित्रकार
म. वि. सोवनी
२०७ सदाशिव पेठ,
पुणे २.

# आभार

नवसाक्षरांसाठीं आणि लहान मुलांसाठीं 'कोण काय करतो?' हें पुस्तक आम्हीं मुद्दाम तयार केलें आहे. वाचकांचें सामान्यज्ञान वाढविण्यासाठीं आणि त्यांची जिज्ञासा तृप्त करण्यासाठीं या पुस्तकाचा उपयोग होईल. हें पुस्तक तयार करण्याच्या कामीं श्री. रा. वि. दामले बी. कॉम् आणि श्री. अ. वि. शाळिग्राम बी. ए; बी. टी. या आमच्या मित्रांचें आम्हांला साहाय्य झालें आहे. त्यांना मनःपूर्वक धन्यवाद.

आपले

देवळे-गोंधळेकर

• • •

## देवळे आणि गोंधळेकर यांचीं पुस्तकें

१. गोष्टींच गोष्टी भाग १ ते ५
२. मुलांचें सामान्यज्ञान भाग १ ते ४
३. आपलें पुरवणीवाचन भाग १ ते ३
४. आपण येथें आणि असें राहतों.
५. कोण काय करतो?
६. "या घ्या गोष्टी" भाग १ ते ५

# अनुक्रमणिका


१. न्यायाधीश ५
२. शिरस्तेदार ५
३. वकील ५
४. बरिस्टर ६
५. वकिलाचा कारकून ६
६. डॉक्टर ६
७. नर्स ७
८. कंपाउंडर ७
९. मुख्याध्यापक ७
१०. प्रिन्सिपॉल ८
११. स्टेशनमास्तर ८
१२. पोर्टर ८
१३. रेल्वे–गार्ड ९
१४. तिकिट–चेकर ९
१५. बोटीचा कप्तान ९
१६. वैमानिक १०
१७. पोलिस इन्स्पेक्टर १०
१८. रहदारीवरील पोलिस १०
१९. सी. आय्. डी. ११
२०. होमगार्ड ११
२१. पोलिस ११
२२. सैनिक १२
२३. शिंपीदादा १२
२४. कोळी १२
२५. मोलकरीण १३
२६. परीट १३
२७. सलूनवाला १३
२८. गडी १४
२९. प्रकाशक १४
३०. संपादक १४
३१. लेखक १५
३२. कवि १५
३३. कंपॉझिटर १५
३४. ब्लॉकमेकर १६
३५. शाहीर १६
३६. मालीशवाला १६
३७. फेरीवाला १७
३८. वासुदेव १७
३९. हातगाडीवाला १७
४०. फळें विकणारी बाई १८
४१. पट्टेवाला १८
४२. छत्रीधारी सैनिक १८
४३. चित्रपट–दिग्दर्शक १९
४४. सिनेमा–नट १९


४५. सिनेमा—नटी १९
४६. वक्ता २०
४७. बालवीर २०
४८. शास्त्रीय संशोधक २०
४९. पाहिलवान २१
५०. केमिस्ट २१
५१. कारकून २१
५२. इंजिनीयर २२
५३. दुकानदार २२
५४. खाणावळवाला २२
५५. सिव्हिल् सर्जन २३
५६. इन्कमटॅक्स् ऑफिसर २३
५७. नाटककार २३
५८. कंपनीचे डायरेक्टर २४
५९. सिनेमा ऑपरेटर २४
६०. वेषभूषाकार २४
६१. शेतकरी २५
६२. ग्रंथपाल २५
६३. डोअरकीपर २५
६४. राष्ट्राध्यक्ष २६
६५. कलेक्टर २६
६६. मामलेदार २६
६७. राज्यपाल २७
६८. पाटील २७
६९. तलाठी २७
७०. पंतप्रधान २८
७१. परराष्ट्रमंत्री २८
७२. गृहमंत्री २८
७३. संरक्षणमंत्री २९
७४. स्पीकर २९
७५. परराष्ट्रीय वकील २९
७६. राज्याचा मुख्य मंत्री ३०
७७. उद्योगमंत्री ३०
७८. हॉटेलवाला ३०
७९. गिरणीवाला ३१
८०. मांडववाला ३१
८१. घड्याळवाला ३१
८२. टाळाचावीवाला ३२
८३. कल्हईवाला ३२
८४. हलवाई दादा ३२
८५. भडभुंजी ३३
८६. पोस्टमन ३३
८७. वाजंत्रीवाले ३३
८८. टांगेवाला ३४
८९. रिक्षावाला ३४
९०. दूधवाला ३४
९१. हमाल ३५
९२. दलाल ३५
९३. दिवाणजी ३५
९४. गवईबुवा ३६
९५. कीर्तनकार ३६
९६. शिल्पकार ३६
९७. फोटोग्राफर ३७
९८. फ्रेममेकर ३७
९९. सुगंधीवाला ३७
१००. कापडवाला ३८
१०१. शिंपी ३८
१०२. फटाक्याचा दुकानदार ३८
१०३. फुलवाला माळी ३९
१०४. वाणीदादा ३९
१०५. संपादक ३९
१०६. भटजीबुवा ४०
१०७. खेळण्याचें दुकानदार ४०
१०८. ... आणि तुम्ही ४०

* * *

विभाग
क्रमांक
नों. दि.

# कोण काय करतो ?

## न्यायाधीश



अंगांत डगला आणि डोक्याला केसाळ टोपी घातलेले हे न्यायाधीश ! हे काय करतात ? खऱ्याखोट्याचा निर्णय करतात, न्याय देतात. चोर–दरोडेखोर, गुंड यांना शिक्षा देऊन यांच्यापासून आपलें संरक्षण करण्यास मदत करतात.

* * *

## क्लार्क ऑफ द् कोर्ट ( शिरस्तेदार )



न्यायाधीशाशेजारीं हे कारकूनबुवा बसले आहेत ! साक्षीदार, आरोपी यांना हे नोटिसा काढतात व आपल्या सहीनें बोलावणीं पाठवितात बरें का ! खटला चालला असतां त्याचा तपशीलवार अहवाल हे लिहितात.

* * *

## वकील



वकील म्हणजे कायद्याचा मालकच ! कायद्यांतील शब्दावर खेळून वकीलमहाराज आपल्या अशिलाला आरोपांतून सोडविण्याचा प्रयत्न करतात. वकील खऱ्याचें खोटें करतात असें नाहीं बरं का ! एखादी गोष्ट कायद्याच्या कक्षेंत बसते का नाहीं हें दाखविण्याचा ते प्रयत्न करतात. चांगला हुशार वकील महिना शेंकडों रुपये मिळवितो !

* * *

## बॅरिस्टर



वकिलांचा दादा असा हा बॅरिस्टर म्हणजे कायद्यांचा अगदीं गड्डाच ! कायद्यांतील बारीक-सारीक माहिती देखील बॅरिस्टरला ठाऊक असते. बॅरिस्टर हायकोर्टांत वकिली करतात. वकिलांपेक्षां बॅरिस्टर पैसे जास्त मिळवितात. पूर्वीं बॅरिस्टर होण्यासाठीं विलायतेला जावें लागत असे ! आपले हल्लींचे मोठमोठे पुढारी बॅरिस्टरच आहेत.

* * *

## वकिलाचा कारकून



वकिलाचा कारकून म्हणजे हक्कदारच ! प्रसिद्ध वकिलाकडे निरनिराळ्या खटल्यांच्या कामासाठीं रोज शेंकडों लोक येतात. त्यांचे अर्ज घेणें, नोटिसा पाठविणें, खाते उतारे काढून देणें हीं कामें कारकूनबुवा करतात. आपलें काम चटकन् व्हावें म्हणून अशील नेहमीं कारकुनाला खूष ठेवण्याचा प्रयत्न करतात ! कारकुनाला अशी रोजची बरीच कमाई असते ! वकिलाकडून या कारकुनाला मिळणारा पगार अगदीं थोडा ! तरी देखील ही स्वारी ऐटींत असते ! कां बुवा ? आलं का लक्षांत ?

* * *

## डॉक्टर



हे सुटाबुटांतले तरतरीत आणि उंच गृहस्थ कोण ? हे तर डॉक्टर ! हे रोग्यांशीं ममतेनें बोलतात. त्यांना धीर देतात. त्यांचा आजार औषध देऊन बरा करतात ! औषध घेणाऱ्या लोकांनीं दिलेले पैसे हेंच त्यांचं उत्पन्न !

* * *

## नर्स



या पांढऱ्या शुभ्र पोषाखांतल्या बाई कोण? या आपल्या नर्सताई! आजाऱ्यांची फार काळजी घेतात. त्या वेळेवर औषध देतात, थर्मामीटर लावून ताप पाहतात, अंथरूण पांघरूण नीट घालतात. किती प्रेमळ आहेत त्या!

* * *

## कंपाउंडर



या खिडकींतून आंत पाहा. कंपाउंडर दादा काय करीत आहेत? डॉक्टरांनीं सांगितलेलीं औषधें झटपट तयार करीत आहेत. चला, आपलें औषध यांनीं तयार केलें आहे तें घेऊं आणि जाऊं घरीं.

* * *

## मुख्याध्यापक



काय शाळेंत नांव घालावयाचें आहे? तर मग आधीं मुख्याध्यापकांना भेटा. शाळेची भरभराट व्हावी म्हणून यांना किती कळकळ आहे! मुलाचें वर्तन व अभ्यास सुधारावा म्हणून हे कशी शिस्त ठेवतात ती पाहा! विद्यार्थ्यांशीं व शिक्षकांशीं हे आपुलकीनें वागतात.

* * *

## प्रिन्सिपॉल



हे साहेबी पोषाख केलेले कॉलेजचे प्रिन्सिपॉल बरं का ! कॉलेजांत शिस्त राहावी म्हणून फार लक्ष देतात ! विद्यार्थ्यांशीं मित्रासारखे वागतात. वर्गांत शिकवितांना ते देहभान विसरतात.

* * *

## स्टेशनमास्तर

ठण् ठण् ठण् .... घंटा वाजली ! पाहा गाडी आली ! या स्टेशनची जबाबदारी कोणावर आहे ? स्टेशनमास्तरवर ! कोणती गाडी केव्हां येणार, कोणत्या गाडीला उशीर आहे, मालगाडी केव्हां सोडावयाची, उतारूंची नीट सोय झाली का नाहीं, या गोष्टी हे स्टेशनमास्तर पाहतात.



* * *

## पोर्टर



हिरवें निशाण हालवीत हा कोण उभा आहे ? हा तर रेल्वेचा पोर्टर ! गाडी सुरू करण्याची आज्ञा गार्डानें दिली कीं, पोर्टर हिरवें निशाण दाखवितो ! गाडी थांबवावयाची असेल त्या वेळीं तो तांबडें निशाण दाखवितो ! निशाणें दाखवितांना त्याला काळजी घ्यावी लागते.

* * *

## रेल्वे गार्ड

शू ऽऽऽ हू ऽऽऽ अशी शिट्टी गार्डानें वाजविली आणि हिरवें निशाण हालविलें कीं आगगाडीला सुटण्याचा इषारा मिळाला, असें समजावयाचें ! या गार्डसाहेबांचा पोषाख अगदीं पांढरा शुभ्र ! गाडीची जबाबदारी गार्डावर असते. गाडींत दंगाधोपा झाला तर



गार्ड व पोलिस त्याचा बंदोबस्त करतात ! नुसती सांखळी ओढली कीं, गार्ड आलाच डब्यांत !

* * *

## तिकिट चेकर



फुकट प्रवास करणारे लोक तिकिट चेकर आला कीं भितात ! कां बरें ? तिकिट चेकर अशा फुकट प्रवास करणाऱ्या गुन्हेगारांना पकडतो ! त्यांच्याकडून पैसे वसूल करतो ! त्यांना दंड भरावयास लावतो ! नाहींतर तुरुंगाची वाट दाखवितो ! तिकिट चेकर अचानकपणें गाडींत शिरून डब्यांतील प्रवाशांचीं तिकिटें पाहतात !

* * *

## बोटीचा कप्तान

"वारा फोफावला । दर्या उफाळला ॥" तरी देखील आपली बोट हे कप्तानदादा मोठ्या धडाडीनें समुद्रांत लोटतात. दूरदूरचा प्रवास समुद्रांतून करतात. माणसांची आणि मालाची ने आण करतात. एका देशांतला माल दुसऱ्या देशांत नेतात. जगाची सहल



करतां येते. तुम्हांला नाहीं वाटत बोटीचा कप्तान व्हावेंसें ?

* * *

## वैमानिक



“ किति मौज दिसे ही पहा तरी । हें विमान फिरतें अधांतरीं ॥ ”

विमान कोण उडवितो ? वैमानिक. पोषाख कसा कडक आहे ! वैमानिक मोठा बळकट व उंचापुरा आहे. विमान चालविण्याचें अवघड काम तो करतो. ढगांतून देखील प्रवास करतो. मौज आहे नाहीं ! लढाईच्या वेळीं शत्रूच्या प्रदेशावर बाँब गोळे टाकण्याचें काम विमानांतूनच करतां येतें.

* * *

## पोलिस इन्स्पेक्टर

खाकी कडक पोषाख. कमरेला पिस्तूल ! रुबाबदार चेहरा व पिळदार मिशा ! कोण बरें हे ! पोलिस इन्स्पेक्टर बरें का हे. गुन्हे शोधून काढतात. दरोडेखोरांना पकडून आणतात. पोलिसांना शिस्त लावतात. जीव धोक्यांत घालावयास डरत नाहींत. तळहातावर शिर घेऊन गुन्ह्यांचा तपास करतात.



* * *

## रहदारीवरील पोलिस



पांढरा पोषाख घातलेला आणि रस्त्याच्या मधोमध उभा राहणारा हा रहदारीवरील पोलिस आहे. गर्दीमध्यें अपघात होऊं नये म्हणून लोकांना हात दाखवून अडवितो व आळीपाळीनें जाऊं देतो. याचा हुकूम मोडूं नका हं ! शिक्षा होईल !

* * *

विभाग ... क्रमांक ... नों. दि.



## सी. आय्. डी.



गुन्ह्यांचा शोध कसा लागतो ? त्याचे धागेदोरे कोण शोधतो ? अर्थात् सी. आय्. डी. ! सी. आय्. डी. ला निरनिराळे वेष करून फिरावें लागतें. मवाल्यांचा अड्डा, दारूचे गुत्ते, गुप्त गुहा या ठिकाणीं ही स्वारी धीटपणें फिरते आणि गुन्ह्यांचा तपास लावते ! बहिर्जी नाईक तुम्हांला ठाऊक आहेच ! अगदीं तसलें काम हुषार सी. आय्. डी. करीत असतात.

* * *

## होमगार्ड



कडक खाकी वेषांतील हे गृहरक्षक बरं का ! सर्वच ठिकाणीं पोलिस ठेवणें शक्य नसतें. सभा, यात्रा, उत्सव इत्यादि सार्वजनिक कामांत शांतता राखण्यासाठीं सरकारनें गृहरक्षक दल उभारलें आहे. हे गृहरक्षक स्वयंसेवक आहेत. ते वेतन घेत नाहींत. आपल्या लोकांची सेवा करण्यासाठीं हे खुषीनें भाग घेतात. तुम्ही होमगार्ड होणार ना ?

* * *

## पोलिस



हा खाकी पोषाखांतील पोलिस शिपाई ! चौकीवर पहारा करीत बसला आहे. तो तुमच्या तक्रारी ऐकून घेतो. गुन्हेगारांचा पाठलाग करून त्यांना पकडण्याच्या कामीं आपणांस मदत करतो.

* * *

## सैनिक



" शिंग फुंकिलें रणीं । वाजतात चौघडे ॥" सैनिकाला रणवाद्यें वाजूं लागलीं कीं, स्फूर्ति येते. सैनिक राष्ट्रासाठीं मरावयास तयार असतो. तो स्वतः मरतो आणि हजारों लोकांचें रक्षण करतो. सैनिकाला भीति ठाऊक नाहीं. पराक्रम करून मानचिन्हें मिळविणें, हेंच सैनिकाचें भूषण! देशासाठीं तुम्ही सैनिक होणार ना?

* * *

## शिंपीदादा



नवीन नवीन फॅशनचे कपडे आपण पाहतों. शिंपी आपणाला नव्या नव्या फॅशनचे कपडे तयार करून देतात. शिवणकाम ही एक मोठी कला आहे. बरोबर मापाचे कपडे शिवणें हें काम लक्षपूर्वक करावें लागतें. शिंपी बारीकसारीक गोष्टी फार काळजीपूर्वक करतो. चांगला शिंपी आपल्या धंद्यांत खूप पैसा मिळवितो!

* * *

## कोळी



हा काळाकुळकुळीत व तरतरीत माणूस पाहा. हा कोळी! समुद्रांत आपलीं जाळीं टाकतो. मासे धरून आणतो. ताजे मासे हा बाजारांत विकतो. मिळालेल्या पैशांतून आपणाला हव्या त्या वस्तु घेऊन घरीं जातो. कोळी आनंदी आहे. तो गाणें म्हणतो. रात्रीं गाढ व शांत झोपतो. ताजे मासे व भाकर मोठ्या आवडीनें खातो!

* * *

## मोलकरीण



ही भांडीं घाशीत कोण बसली आहे ? ही तर विचारी मोलकरीण ! गरीब आहे विचारी ! पांच सहा घरचीं कामें, धुणीं-भांडीं ही रोज करते तेव्हां कोठें हिला पंधरा वीस रुपये महिन्याला मिळतात. कष्ट फार आणि मिळकत थोडी ! कशीबशी विचारी भागवा-भागवी करते ! !

* * *

## परीट



नदीच्या काठीं कधीं जातां कीं नाहीं ? काय काय दिसतें तेथें ? परीट तेथें कपडे धूत असतात. ते कपडे अगदीं बगळ्याच्या पंखासारखे शुभ्र करतात. परीट कपडे गोळा करून आणतात. सोडा–साबणाची भट्टी लावतात. नदींत कपडे धुतात. एका वेळीं १००–१०० कपडे धुण्याची ताकद परटांत आहे. धुतलेल्या पांढऱ्या कपड्याला ते नीळ देतात. उन्हांत कपडे वाळले कीं ते चकाकतात. त्याला इस्त्री करतात व आपल्या गिऱ्हाइकाकडे पोहोंचवितात !

* * *

## सलूनवाला



छानदार भांग पाडून ऐटींत फिरावें असें तुम्हांला वाटतें ना ! पण केस नीट कापलेले असले पाहिजेत. सलूनमधले न्हावीदादा ते नीट कापतात. केस कापणें हें कौशल्याचें काम आहे. निरनिराळ्या फॅशनचे केस कापणें अवघड आहे, पण सलूनवाले तें सहज करतात.

* * *

## गडी



हा पाहा मुंबईचा रामा गडी. याला बल्या म्हणतात. कोंकणांतून कामासाठीं तो मुंबईस आला आहे. धुणींभांडीं वगैरे सगळीं कामें हा करतो. रामा मोठा गमत्या आणि आनंदी आहे. रामा कोंकणी गाणीं म्हणतो व गौरीचा नाच पण करतो. पान–तंबाखू हीच रामाची करमणूक !

* * *

## प्रकाशक



तुम्हांला छान छान पुस्तकें कोण देतो ? प्रकाशक बरें का ! ते लेखकांना लिहायला उत्तेजन देतात. निरनिराळ्या लेखकांचीं पुस्तकें छापून प्रकाशित करतात; चांगल्या चांगल्या गोष्टींचीं पुस्तकें आपल्याला पुरवतात.

* * *

## संपादक



शालापत्रक, आनंद, मुलांचें मासिक अशीं छान छान मासिकें तुम्ही मोठ्या आवडीनें वाचतां. हीं मासिकें आपणांस संपादक महाशय देतात बरें का ! लोक आपल्या गोष्टी, कविता व लेख यांच्याकडे पाठवितात. त्यांतल्या चांगल्या कविता व लेख हे निवडतात. तें सारें साहित्य चांगली सजावट करून व छापून संपादक आपल्याला दरमहा देतात. आपलें सामान्यज्ञान वाढविण्यास हे मदत करतात.

* * *

## लेखक



हे आपल्याच विचारांत गुंग आहेत! हे कांहींतरी लिहीत आहेत. हे लेखक आहेत. सुंदर सुंदर गोष्टी यांना सुचतात. त्या छान छान शब्दांत हे लेखक आपणांला सांगतात. त्यांच्या गोष्टी व लेख वाचून आपल्याला आनंद होतो आणि आपला कंटाळा जातो.

* * *

## कवि



हे कविराज बरं का! एखादी गोष्ट पाहिली कीं, यांच्या मनांत ती भरते. मग ते कविता करतात. कविता आपणांला आनंद देतात. कविता गुणगुणणें तुम्हांला आवडतें कीं नाहीं? कवितांच्या वेगवेगळ्या चाली असतात.

* * *

## कंपॉझिटर



छापलेलें पुस्तक तुम्ही वाचतां! हें पुस्तक तयार कोण करतो? छापखान्यांतील कंपॉझिटर. यांना मजकुराप्रमाणें खिळेजुळणी करावी लागते! संवयीमुळें खिळेजुळणीचें अवघड काम ते भराभर करतात! त्यांना फारच काळजी घ्यावी लागते; नाहींतर जुळलेला मजकूर अशुद्ध होईल आणि दुरुस्तीचा दुप्पट त्रास पडेल!

* * *

## ब्लॉकमेकर



पुस्तकांत,मासिकांत सुंदर चित्रें असतात. चित्रकारानें चित्र काढून दिलें कीं, त्याचा ब्लॉक करावा लागतो. यांनीं ब्लॉक केला म्हणजे वाटेल तेवढीं चित्रें भराभर छापून काढतां येतात !

* * *

## शाहीर

“ आधिं नमन शारदाचरणा” अशी सुरुवात करून डफावर थाप मारीत शाहीर पोवाडे गातो.शाहिराचा आवाज मोठा व खडा असतो. शाहीर ऐतिहासिक पोवाडे गाऊन लोकांना जागे करतो आणि लावण्या म्हणून त्यांची करमणूक करतो.



* * *

## मालीशवाला



हा पाहा “ आऽऽला माऽऽलीऽऽश ” करीत मालीशवाला आला. मालीशवाला सर्व अंगाला तेल लावून तें शास्त्रोक्त रीतीनें रगडतो. मालीश केल्यामुळें शरीर मोकळें होतें आणि रात्रीं गाढ झोप लागते. दिवसभर मालीशवाला हिंडत असतो. गिऱ्हाइकें मिळालीं तर कमाई व्हावयाची; नाहींतर राहा उपाशी !

* * *

## फेरीवाला



" चणा जोर गरम बाबू मैं लाया मजेदार " हें तुम्ही रोज ऐकतां! असे फेरीवाले तुम्ही रोज पाहतां. फेरीवाले दिवसभर गांवांत ओरडत फिरतात. आपला माल खपवितात. पण त्यांना फायदा फार होतोच असें नाहीं. कधीं कधीं कांहीं सुद्धां फायदा होत नाहीं; पण फेरीवाला आनंदी गृहस्थ आहे.

* * *

## वासुदेव



मोराच्या पिसांची टोपी घातलेला वासुदेव ठाऊक आहे का? अगदीं पहाटे हा नाचत व गाणें म्हणत येऊन तुम्हांला जागे करतो. मोठा गमत्या व आनंदी माणूस आहे! मिळेल त्या पैशावर हा समाधान मानतो!

* * *

## हातगाडीवाला



हा हातगाडीवाला बरं का! हा दिवसभर लोकांचा माल गाडीवर घालून पोहोंचता करतो. याला गाडी ओढण्याचे कष्ट होतात. पण तरी देखील हा आनंदी आहे. रात्रीं जेवण केल्यावर याला शांत झोप येते. उद्यांची काळजी हा करीत नाहीं. गेला दिवस तो आपला अशी बेफिकिरीची वृत्ति असते याची!

* * *

## फळें विकणारी बाई



मधली सुट्टी झाली. चला पेरू घेऊं. ही शाळेच्या कोपऱ्यावर फळें विकणारी बाई बसली आहे. ही ताजे पेरू विकायला आणते. तिच्याजवळ मीठ–तिखट देखील आहे. पेरू चिरून पाहिजे ना! ही बाई फळें विकून चार पैसे मिळविते व आपल्या मुलांबाळांचा सांभाळ करते. हिचा मुलगा पण शाळेंत शिकत आहे. या गरीब बाईला फसवूं नका बरं का!

* * *


## पट्टेवाला



ऑफिसांत शिपायाचें काम कोण करतो? पट्टेवाला! पट्टेवाल्याचा पोषाख पांढरा, तांबडा किंवा खाकी असतो. डोक्यावर पगडी असते. कमरेला पट्टा आणि बिल्ला! ऑफिसच्या कागदपत्रांची ने–आण करणें, पाणी भरून ठेवणें, निरोप पोहोंचविणें, रजिस्टर करणें, पोस्टकार्डें आणणें, टाकणें, टपालाची व्यवस्था पाहणें हीं कामें पट्टेवाला करतो! साहेबाची मर्जी राखण्यासाठीं पट्टेवाल्याची कोण लटपट आणि खटपट!

* * *

## छत्रीधारी सैनिक



हा किती धाडसी आहे! विमानांतून छत्री घेऊन खालीं उडी टाकतो! शत्रूच्या मुलखांत घुसून लढाई करतो. याची छत्री किती बळकट आहे पाहा! रेशमाची केली आहे! ती वाऱ्यानें फाटत नाहीं. पाठीशीं बांधलेली बंदुक व गोळ्यांची पिशवी पाहा!

* * *

## चित्रपट–दिग्दर्शक



सिनेमाला जायचं झालं कीं, तुम्ही घर डोक्यावर घेतां! खरं ना! हा सिनेमा कोण काढतो? दिग्दर्शक! दिग्दर्शकाला किती बारीकसारीक गोष्टींचा विचार करावा लागतो. सिनेमा काढावयाचा म्हटला कीं, पैसा, नटनटी, छायाचित्रण, ध्वनिलेखन, संगीत, पोषाख, एक ना हजारों गोष्टी दिग्दर्शकाला जमवाव्या लागतात! अवघड आहे काम बरं का!

* * *

## सिनेमा–नट



सिनेमा-नटाला नटीच्या खालोखाल पगार मिळतो. नट देखील आपलें काम चांगलें वठावें म्हणून मेहनत घेतो. नटाची राहणी श्रीमंती थाटाची व चैनीची असते. एक–दोन प्रसिद्ध नट सांगा बरें? केशवराव दाते, अशोककुमार, दिलीपकुमार.

* * *

## सिनेमा–नटी



सिनेमा–नटीची हल्लीं लोक फार स्तुति करतात. तिचें काम कौशल्याचें असतें. आपलें काम चांगलें व्हावें म्हणून नटी फार काळजी घेते. नटीला खूप पगार मिळतो. नटीची राहणी श्रीमंती थाटाची व चैनीची असते. प्रसिद्ध नटी कोण कोण आहेत? नार्गिस, सुलोचना, बेबी शकुंतला.

* * *

## वक्ता



"वक्ता दशसहस्रेषु" असें म्हणतात. दहा हजार लोकांत एखादा उत्तम वक्ता असतो. वक्ता आपले विचार हजारों लोकांच्या प्रचंड सभेंत न भितां मांडतो. आपल्या भाषणशैलीनें तो आपले विचार लोकांच्या मनावर बिंबविण्याचा प्रयत्न करतो. समाजाला वळण लावणें वक्त्यावर अवलंबून आहे. राष्ट्रीय पुढारी हे उत्तम वक्ते असतात. उदाहरणार्थ बॅ. सावरकर.

* * *

## बालवीर



हा सुटसुटीत व रुबाबदार पोषाख केलेला बालवीर ! हा आपले कार्यक्रम नियमित करतो. परोपकार व मदत करण्यास हा नेहमीं तत्पर असतो. आपण बालवीरापासून वक्तशीरपणा व शिस्त शिकूं या.

* * *

## शास्त्रीय संशोधक



रेडिओ, विमान, मोटार ह्या गोष्टी तुम्हांला ठाऊक आहेत. मोटारी व विमानें यंत्रानें चालतात. बटण दाबलें कीं, रेडिओ लागला बोलायला! हे शोध कोणीं लावले ? संशोधकानें संशोधक फार कष्ट घेतात. ते आपल्या प्रयोगशाळेंत सारखे प्रयोग करतात. ते रात्रीचे दिवस करून शोध लावतात. आपलें जीवन संशोधकांनीं किती सुखाचें केलें आहे !

* * *

## पहिलवान



"जय बजरंग" असें म्हणून कोण घुमत आहे पाहा. हे तर वस्ताद! यांचें शरीर पाहा कसें पीळदार आणि मजबूत आहे! पहाटे उठून पहिलवान हजार हजार जोर काढतात. कुस्त्या करतात. दूध व बदाम यांसारखा सकस अन्नाचा खुराक खातात, फडांत कुस्त्या करतात. कुस्ती जिंकली कीं, पहिलवानास आनंद होतो. तुम्हांला पीळदार शरीर आवडतें ना! मग व्यायाम नियमित करीत जा बरं का!

* * *

## केमिस्ट



काय? डॉक्टरांनीं औषध लिहून दिलें आहे? ठीक; चला केमिस्टकडे जाऊं. केमिस्ट आपल्याला लागणारीं सर्व देशी–परदेशी औषधें विक्रीला ठेवतात. केमिस्टला औषधांचीं नांवें आणि किंमती अगदीं तोंडपाठ असतात. औषधाचें नांव सांगायचा अवकाश कीं, त्यांनीं औषधाची बाटली कपाटांतून काढून दिलीच म्हणून समजा.

* * *

## कारकून

६२३८



खालीं मान घालून एकसारखे लिहीत बसलेले कोण हे? हे तर कारकूनबुवा! यांना सारखी खरडेघाशी करावी लागते! कारकूनबुवा तसे कामांत वाकबगार आहेत बरें का!

* * *

## इंजिनीयर



ताजमहालसारखी सुंदर इमारत कुशल इंजिनीयरच बांधूं शकतो! शंभर शंभर मजली इमारती, गोल घुमट, प्रचंड राजवाडे आणि मोठमोठीं धरणें, कालवे, रस्ते सर्व कोण करवून घेतो? इंजिनीयर बरं का! पाटबंधारे, नौकानयन खातें, लष्करी बांधणी खातें, यांत मुख्य इंजिनीयरच असतात. कांहीं इंजिनीयर खाजगी धंदाहि करतात. कंत्राटें घेतात व खूप पैसा मिळवितात.

* * *

## दुकानदार



दुकानदार आपल्या किती उपयोगी पडतो बरं! आपणांला पाहिजे असलेली वस्तु दुकानदाराला दुकानांत ठेवावी लागते! टांचणी, कागद, बांगड्या, कापड, पुस्तकें, गूळ, डाळी, मसाले, कांहींहि मागा, दुकानदार वेळेला देतात. दुकानदारांना वस्तु विकून फायदा होतो, पण जगांतल्या कुठल्याहि वस्तु दुकानदारांमुळें आपणांला घरबसल्या मिळतात कीं नाहीं? आपल्याजवळ पैसे नसले तर दुकानदार आपणांस उधार माल देखील देतो. असा दुकानदार म्हणजे मोठा समाजसेवक नव्हे का?

* * *

## खाणावळवाला



शहरांत जागेची किती टंचाई आहे! निजायला जागा नाहीं, मग जेवण करण्यास कोठली? पण खाणावळवाल्यामुळें आपली ही सोय होते. हातानें जेवण शिजविण्याची दगदग वांचते! वेळेवर जेवण मिळतें. खाणावळवाला चांगला असला कीं पैसे महिन्यानें दिले तरी चालतात! लोकांची अडचण खाणावळी व हॉटेलें यामुळें दूर झाली आहे. पण नेहमीं हॉटेलांत जाणें चांगलें नाहीं बरं का!

## सिव्हिल सर्जन



जिल्ह्याच्या सरकारी हॉस्पिटलमधील मुख्य डॉक्टर असतात, त्यांना 'सिव्हिल सर्जन' म्हणतात. हे बड्या पगाराचे सरकारी अधिकारी असतात. सरकारी नोकरांना वैद्यकीय तपासणी करून घ्यावी लागते व सिव्हिल सर्जनचे सर्टिफिकेट दाखवावें लागतें. सिव्हिल सर्जनवर जिल्ह्यांतील आरोग्याची मोठीच जबाबदारी असते.

* * *

## इन्कमटॅक्स ऑफिसर



मोठमोठ्या श्रीमंत गृहस्थांना आपल्या उत्पन्नावर टॅक्स (कर) भरावा लागतो. हा कर गोळा करण्यासाठीं इन्कमटॅक्स ऑफिसर हा सरकारी अधिकारी असतो. सगळेच लोक प्रामाणिक नसतात. त्यामुळें इन्कमटॅक्स ऑफिसरला लोकांचें खरें उत्पन्न किती याची बारकाईनें माहिती काढावी लागते.

* * *

## नाटककार



लोकांची करमणूक करण्यास कोण मदत करतो ? नाटककार. नाटककार नाटकें लिहून लोकांना रमवितो. तो नाटकाच्या द्वारें लोकांना शिक्षणहि देतो. तो लोकांना हसवायला लावतो आणि रडवितो देखील ! पण हें रडणें लोकांना आवडतें ! कै. राम गणेश गडकरी, कै. काकासाहेब खाडिलकर हे थोर नाटककार होऊन गेले. श्री. वरेरकर, आचार्य अत्रे हे मोठे नाटककार आहेत.

* * *


## कंपनीचे डायरेक्टर



विमा कंपन्या, बँका व निरनिराळे कारखाने या संस्था भागीदारांनीं निवडून दिलेल्या बोर्डाच्या ( समितीच्या ) सल्ल्यानें चालतात. या बोर्डावर जे सभासद असतात त्यांना डायरेक्टर म्हणतात. डायरेक्टर निरनिराळे ठराव करतात व वेळोवेळीं संस्थेला सल्ला देतात. संस्थेचें हित पाहणें व संस्थेची भरभराट करणें हें डायरेक्टरांचें कर्तव्य आहे.

* * *

## सिनेमा ऑपरेटर



आपणांस सिनेमा पडद्यावर कोण दाखवितो ? सिनेमा ऑपरेटर. सिनेमाच्या फिल्म्स असतात. त्या तो प्रेक्षकांना दाखवितो. ही त्याची नोकरी आहे. दररोज दोन किंवा तीन खेळ त्याला दाखवावे लागतात. सिनेमाच्या फिल्म्सची व यंत्रांची याला नीट माहिती असते.

* * *

## वेषभूषाकार



चित्रपटांत किंवा नाटकांत पात्रांना योग्य तो वेष देणें, मागील देखावा त्याला अनुरूप ठेवणें व योग्य वातावरण निर्माण करणें हीं कामें वेषभूषाकाराला करावीं लागतात. त्यासाठीं त्याच्या अंगीं चौकस बुद्धि व बारकाईचें निरीक्षण करण्याची पात्रता असावी लागते.

* * *

## शेतकरी

"आम्ही दैवाचे दैवाचे शेतकरी रे।
करूं काम, स्मरूं नाम, मुखीं राम हरी रे॥"



असें म्हणत शेतावर राबणारा हा शेतकरी! सकाळपासून संध्याकाळपर्यंत शेतावर काम करतो. गहूं, तांदूळ, जोंधळा पिकवितो, भाजीपाला पिकवितो. शहरांतील लोकांना अन्न पुरवतो. शेतकरी गरीब आहे. त्याची परिस्थिति सुधारली पाहिजे. तो पावसावर अवलंबून असतो, पाऊस पडला नाहीं तर तो हवालदिल होतो. धरणें बांधून आणि कालवे काढून सरकार शेतकऱ्यांना शेतीसाठीं पाणी पुरविणार आहे.

* * *

## ग्रंथपाल



ग्रंथालय नमुनेदार कोण लावतो? ग्रंथपाल. तुम्हांला पाहिजे तें पुस्तक ते चटकन् काढून देतात. नवीं नवीं वाचण्याजोगीं पुस्तकें कोणतीं हें ग्रंथपाल सांगतात. नवीन ग्रंथ खरेदी करण्याकडे ते लक्ष देतात. कोणतीं पुस्तकें नुकतींच प्रकाशित झालीं आहेत, हें यांना ठाऊक असतें. पुस्तकांचे प्रकाशक व संपादक यांची माहिती त्यांना असते.

* * *

## डोअरकीपर




नाटक–सिनेमाचें तिकिट काढल्यावर आपण थिएटरच्या दरवाजाजवळ जातों. दरवाजाजवळ आपलें तिकिट कोण फाडतो? डोअरकीपर. डोअरकीपरला वेळेवर हजर राहावें लागतें. प्रेक्षकांची नीट व्यवस्था झाली कीं नाहीं हें तो पाहतो.

* * *

## राष्ट्राध्यक्ष



आपलें राष्ट्र लोकशाहीपद्धतीचें आहे. लोकशाही राष्ट्रांत राजा नसतो ! मग कारभार कोण चालवतो ? देशानें निवडून दिलेले राष्ट्राध्यक्ष हा कारभार करतात. देशाच्या साऱ्या कारभाराची जबाबदारी यांच्यावर असते. सारा कारभार यांच्या नांवानें चालतो. पास होणाऱ्या प्रत्येक कायद्यावर यांची सही लागते. मंत्रिमंडळाला व मुख्य प्रधानाला ते सल्ला देतात. सध्यां आपले राष्ट्राध्यक्ष कोण आहेत ?—बाबू राजेंद्रप्रसाद.

* * *

## कलेक्टर



कलेक्टर म्हणजे वसूल करणारा. कलेक्टरला आपण 'जिल्हाधिकारी' म्हणतों. कलेक्टर हा जिल्ह्याचा सर्वाधिकारी असतो. तो आय्. ए. एस्. सारखी कठीण परीक्षा उत्तीर्ण झालेला असतो. जिल्ह्यांतील वसुलीचा तो मुख्य अधिकारी असतोच. शिवाय साऱ्या जिल्ह्याची शांतता व कारभार यांची जबाबदारी याच्यावर असते. तसेंच न्यायदानाचें काम देखील हा करतो. लष्करी व नागरी अशीं दोन्ही कामें ह्यास करावीं लागतात.

* * *

## मामलेदार



मामलेदार म्हणजे तालुक्याचे अंमलदार. तालुक्याचा वसूल गोळा करणें, तालुक्याची शांतता व सुव्यवस्था राखणें हीं कामें मामलेदार करतो.

* * *

## राज्यपाल



ना० मुनशी उत्तर प्रदेशाचे राज्यपाल आहेत. प्रांताचे सर्वांत मुख्य अधिकारी गव्हर्नर होत. यांना 'राज्यपाल' असेंहि म्हणतात. राष्ट्राध्यक्ष यांची नेमणूक करतात. ही जागा मोठ्या मानाची आणि बड्या पगाराची आहे. राज्याचा सारा कारभार यांच्या नांवानें चालतो. राज्यपाल हे मुख्य प्रधान व मंत्रिमंडळ यांना सल्ला देण्याचें काम करतात. आणीबाणीच्या प्रसंगीं खास अधिकार वापरून हे सारा कारभार आपल्या हातीं घेतात.

* * *

## पाटील



पाटील म्हणजे गांवचा राजाच ! त्याचा गांवांत दरारा मोठा असतो. पाटील गांवांत शांतता व सुव्यवस्था राखतो. तो गांवचा वसूल सरकारी खजिन्यांत भरतो. पाटील गांवचा वतनदार असतो.

* * *

## तलाठी



गांवांतालि वसूल गोळा करणें हें याचें काम. पाटलांना याची मदत होते. कांहीं कांहीं गांवांत हें काम कुलकर्णी करतात. गांवच्या वसुलीचें दप्तर तलाठ्याच्या ताब्यांत असतें.

* * *

## पंतप्रधान



लोकशाही राष्ट्रांत कारभार कसा चालतो? मंत्रिमंडळाच्या मदतीनें. या मंत्रिमंडळाचा पुढारी मुख्य प्रधान हा असतो. देशाच्या कारभाराची व सरकारच्या धोरणाची जबाबदारी याच्यावर असते. पंतप्रधानाच्या शब्दावर साऱ्या देशाचा कारभार चालत असतो. भारताचे पंतप्रधान कोण आहेत? पंडित नेहरू.

* * *

## परराष्ट्रमंत्री

आपल्या देशाचें दुसऱ्या देशाशीं नातें कोण जोडतो? परराष्ट्रमंत्री. दुसऱ्या देशांशीं मैत्री राखणें हें त्यांचें काम. परराष्ट्रमंत्री मोठे मुत्सद्दी असतात. हल्लीं आपले परराष्ट्रमंत्री कोण आहेत? पंडित नेहरू.

* * *

## गृहमंत्री



राज्याच्या संरक्षणाची जबाबदारी व राज्याचा अंतर्गत कारभार करण्याची जबाबदारी गृहमंत्र्यांवर असते. तुरुंगखातें यांच्या ताब्यांत असतें. राष्ट्राचे गृहमंत्री हे राष्ट्राच्या अंतर्गत कारभाराला जबाबदार असतात. देशांत शांतता राखणें हें त्यांचें काम होय. सरदार पटेल हे स्वतंत्र भारताचे पहिले गृहमंत्री होते.

* * *

## संरक्षणमंत्री

देशांतील सैन्याची व्यवस्था पाहण्याचें काम संरक्षण-मंत्र्याचें असतें. परकीय आक्रमण आलें तर देशाला वांचविण्याची जबाबदारी त्याच्यावर आहे. सैन्यांत आत्मविश्वास व उत्साह निर्माण करणें संरक्षणमंत्र्यावर अवलंबून असतें. सरदार बलदेव-सिंग हे स्वतंत्र भारताचे पहिले संरक्षणमंत्री होते.

* * *

## स्पीकर



विधिमंडळांत किंवा संसदेंत अध्यक्ष-स्थानीं जे बसतात त्यांना स्पीकर असें म्हणतात. विधिमंडळाचा कारभार स्पीकर चालवितात. एखाद्या बिलाची चर्चा सुरू करण्यास अनुमति देणें, सभासदांच्या भाषणावर नियंत्रण ठेवणें, नियमबाह्य गोष्टींची सभागृहांत चर्चा होऊं न देणें व गैरशिस्तीनें वागणाऱ्या सभासदाला आळा घालणें हीं स्पीकरचीं कामें होत. ना. कै. दादासाहेब मावळंकर हे लोकसभेचे पहिले स्पीकर होते. श्री. अनंतशयनम् अय्यंगार हे सध्यां लोकसभेचे स्पीकर आहेत.

* * *

## परराष्ट्रीय वकील



आपला दुसऱ्या देशाशीं स्नेह राखण्यासाठीं आपण त्या देशाचा वकील आपल्या देशांत ठेवतों. आपला वकील देखील परदेशांत धाडतों. आपल्या राष्ट्राचीं धोरणें हा परराष्ट्रीय वकील सांभाळीत असतो. तुम्हांला परराष्ट्रीय वकील व्हावेंसें नाहीं वाटत ?

* * *

## राज्याचा मुख्य मंत्री

आपल्या भारतांत लोकशाही आहे. लोकांनीं बहुमतानें जो पक्ष निवडून दिला असेल, त्या पक्षाचें मंत्रिमंडळ बनविण्यांत येतें व त्या पक्षाचा पुढारी मुख्य मंत्री होतो. राज्याची सर्व प्रकारची जबाबदारी यांच्यावर असते. विधिमंडळांत कायदे करणें, लोकांच्या अडचणी लक्षांत घेणें व त्या दूर करणें याकडे लक्ष पुरवून हे प्रांताचा कारभार पाहतात.


* * *

## उद्योगमंत्री

लोकांना काम मिळालें तर पैसा मिळणार नाहीं का ! पण त्यासाठीं कारखाने हवेत ! हे कारखाने उभारण्यास व उद्योगधंदे वाढविण्यास कोण उत्तेजन देतो बरें ? आपले उद्योगमंत्री हें काम करतात.

* * *

## हॉटेलवाला



आज छोट्या गांवापासून ते मोठमोठ्या शहरांपर्यंत साऱ्या ठिकाणीं हॉटेलें दृष्टीस पडतात. शहरांत निरनिराळ्या लोकांची सारखी ये-जा चालते. त्यांच्या सगळीकडे ओळखी असतातच असें नाहीं. त्यांच्या चहाफराळाची व्यवस्था हॉटेलवाला करीत असतो. तो ताजे, रुचकर व चमचमीत असे फराळाचे पदार्थ तयार करतो. त्यामुळें लोकांची छान सोय होते.

* * *


## गिरणीवाला



मोठ्या गांवांतून आणि शहरांतून पिठाच्या गिरण्या चालू असतात. पूर्वी धान्यें जात्यावर दळीत असत. आतां तेंच काम गिरणीवाले लवकर करून देतात. कांहीं गिरण्या तेलाच्या इंजिनवर चालतात, तर कांहीं गिरण्या विजेवर चालतात.

* * *

## मांडववाला



लग्नमुंजीचे दिवस आले. मांडव टाकायला पाहिजे. गादी, लोड, तक्के हवेत. शोभिवंत मांडव हवा. हें कोण करतात? मांडववाले. मांडव उभारणें, बैठका, पाट, भांडीं पुरवणें, रोषणाई करणें हीं सारीं कामें मांडववाले झटपट करतात. ते सभेच्या ठिकाणीं छोटें व्यासपीठ तयार करतात. नाटकाची रंगभूमि, पडदे सुद्धां बांधून देतात. म्हणून साऱ्या समारंभाला केवढी मजा येते!

* * *

## घड्याळवाला



आजकाल सारीं कामें घड्याळावर चालतात. प्रत्येक जण आपल्या मनगटावर घड्याळ बांधतो. मनगटावरचें घड्याळ, टेबलावरचें घड्याळ, भिंतीवरचें घड्याळ, उंच मनोऱ्यावरचें घड्याळ, जिकडे तिकडे घड्याळेंच घड्याळें! घड्याळ अतिशय नाजूक यंत्र! तें बिघडलें कीं वेळेचा घोटाळा. घड्याळवाले घड्याळें दुरुस्त करतात, नवीं घेऊन देतात. आपली अडचण दूर करतात.

* * *

## टाळाचावीवाला



कधीं कधीं आपली किल्ली हरवते, कुठें तरी पडते आणि मग ट्रंक, बॅग, सायकल, घर वगैरे जिथलें कुलूप असेल तें उघडतां येत नाहीं. टाळा-चावीवाला मात्र हें काम झटपट करतो. त्याच्या जवळ पुष्कळ प्रकारच्या किल्ल्या असतात. तो किल्ल्या तयार करून देतो. तो असा आपल्या अडचणींच्या वेळीं उपयोगी पडतो.

* * *

## कल्हईवाला



"कल्हई लावायची का कल्हई !" केवढी लांबलचक आरोळी ही ! तुम्हांला कदाचित् ती आरोळी कर्कश वाटेल ! रस्त्याच्या कडेला किंवा घराच्या अंगणांत कल्हईवाला दुकान थाटतो आणि थोड्या वेळांत आपलीं निकल्हईचीं भांडीं छान रुपेरी करून देतो ! कल्हईच्या ताटांतले पदार्थ पाहून किती समाधान वाटतें ! कल्हईच्या भांड्यांत पदार्थ आंबत, विटत नाहीं.

* * *

## हलवाई दादा



तुमच्या घरीं लग्न-मुंज आहे का ! मग पेढे हवे असतीलच ! हे पाहा हलवाई दादा ! आर-शाच्या कपाटांत हे पाहा पेढे ! ती वर्फी ! ही खोबऱ्याची, ती आंब्याची, ती कवठाची, ती खव्याची–किती तरी प्रकार ! शिवाय चिवडा सुद्धां निरनिराळ्या प्रकारचा मिळतो. अनेक पक्वान्नेंहि हलवाई दादा तयार करतात हं ! घ्या, पेढा घ्या ! आहे कीं नाहीं सुरेख !

* * *


## भडभुंजी



आपल्याकडे एक म्हण आहे. "ऐट बादशहाची आणि धंदा भडभुंज्याचा!" एखाद्याला हिणवण्यासाठीं असें म्हणतात. खरें म्हणजे भड-भुंज्याची सुद्धां आपल्याला किती गरज असते! कच्चे पोहे, भाजके पोहे, डाळे, चुरमुरे, शेव, शेंगदाणे वगैरे किती प्रकार भडभुंजी तयार ठेवतो. तो लाह्या फोडून देतो, शेंगा भाजून देतो. आतां हें काम करीत असतांना त्याचे कपडे, नाक, तोंड, हातपाय काळेकुट्ट व्हावयाचेच!

* * *

## पोस्टमन



यांचीच वाट तुम्ही पाहात असतां. सकाळीं अथवा संध्याकाळीं ठराविक वेळेला हे गांवांतून हिंडतात. लोकांचीं पत्रें लोकांना नीट पोंचतीं करतात. हे मनिऑर्डर, पार्सलें, तारा सुद्धां आणतात. यांना किती हिंडावें लागतें! तो पाहा पोस्टमन. आहे ना सगळा खाकी पोषाख? "अहो, आमचें पत्र आहे का?"

* * *

## वाजंत्रीवाले



घरांत लग्नकार्य असलें कीं सूरसनईचा आवाज कसा गोड लागतो कानाला! खेडेगांवांत गुरवाची वाजंत्री असते. तशीच महारमंडळींचीहि वाजंत्री कडाडून झडते! शहरांतला थाट काय विचारतां! तेथें बँडचा ताफा तयार असतो. निरनिराळीं देशी विदेशी वाद्यें किती सुरावर, किती पद्धतशीर रीतीनें बँडवाले वाजवतात! मिरवणूक तालासुरावर चालली कीं चालणारा आणि बघणारा दोघेहि आनंदित होतात!

* * *

## टांगेवाला



आपल्या घरापासून आपल्याला पुष्कळ वेळां लांब जायचें असतें. चालत जायचें तर वेळ लागेल. मग टांगेवाला आपल्या मदतीस धांवतो. चांगलें घोडें, बळकट टांगा असला कीं आंत बसावेंसें वाटतें. घोड्याला वेळेवर दाणापाणी, घास, खरारा करावा लागतो. दरवर्षी टांगा पास करून घ्यावा लागतो. टांगा ऐटदार असेल तर बसणारा खूष ! मग टांगेवाला खुषींत म्हणतो,"ए बाबा ! ए दादा !चलो बाजू !"

* * *

## रिक्षावाला



ही तीन चाकी मोटार पाहिलीत का ? हिला 'रिक्षा' म्हणतात. चीनमध्यें आणि ब्रह्मदेशांत दुचाकी रिक्षा माणसेंच ओढतात. नंतर सायकल रिक्षा आली. आणि आतां मोटाररिक्षा ! आंत दोन माणसें बसवून रिक्षावाला झर्रकन् दांडा ओढतो आणि फर्रकन् रिक्षा चालू होते. कुठेंहि कशीहि ती वळवतां येते आणि वेग तरी किती असतो रिक्षाला ! पांचसांत मिनिटांत ती मैलभर धांवते !

* * *

## दूधवाला



पहाट झाली; पण तुम्ही साखरझोंपेंत असतां. त्या वेळीं तुमच्या दारावर थाप बसते, आवाज येतो "दूध !" मग आई उठते. दार उघडून दूध घेते. गवळीबुवा चरवींतून दूध घालतात. सकाळींच ताज्या दुधाचा चहा मिळतो तुम्हांला. दूधवाले सायकलवर दूध पोंचवीत असतात. कित्येक परगांवांहून येतात आणि दूधभट्टीवर दूध घालतात.

* * *

## हमाल



ही भरदार छाती आणि हें पीळदार शरीर कुणाचें? अंगारवांद्यावर मात्र जाड, मळकट कुडतें दिसतें आहे. अरे, यानें तर हां हां म्हणतां हें तांदुळाचें केवढें जड पोतें पाठीवर घेतलें! हाच हमाल बरें का! निरनिराळ्या दुकानांत जड जिन्नस उचलणें, थप्पी लावणें, माल पोचवणें, नेणें, आणणें हीं सारीं कष्टाचीं कामें यांना करावीं लागतात. रेल्वेस्टेशनवरील हमालांची गर्दी तुम्हीं पाहिलीच असेल.

* *

## दलाल



काय ऐटबाज हा मनुष्य! पांढरी किंवा काळी मखमली तिरपी टोपी, नेहरू सदरा, जाकीट, पायांत बूट- आणि हुकमी आवाज! शेतकऱ्यांचा माल शहरांत किंवा मंडईत आला, कीं तो विकून देण्याचें काम हे करतांना दिसतात. त्याबद्दल जे पैसे यांना मिळतात त्याला दलाली म्हणतात.

* * *

## दिवाणजी



तुम्ही कोणत्याहि दुकानांत जा. गल्ल्यावर मालक असतात आणि पलीकडे दुकानांतील सगळ्या मालाच्या देवघेवीचा हिशोब ठेवणारे दिवाणजी आपल्या कामांत चूर असतात. त्यांच्या जमाखर्चाच्या तांवड्या, लांब वह्या पाहा! त्यांत पैन् पैचा हिशोब चोखपणें हे दिवाणजी मांडून ठेवतात. दुकानचा फायदातोटा, देणेघेणें, सारें सारें यांना केव्हांहि मालकांनीं विचारलें कीं ते चटकन् सांगतात.

* * *

## गवईबुवा



"नमस्कार बुवा! आज कुठें बैठक आहे?" "नानासाहेबांकडे! येणार ना?" "हें काय विचारतां? आलोंच हं!" हे कोण? अहो हेच ते प्रसिद्ध गवई बुवा! किती गोड आवाज यांचा! सारी मंडळी यांच्या गाण्यावर नागासारखी डुलत असतात. यांच्या मागें साथीदार असतात—तबलजी, सारंगीवाले, तंबोराधारी; आणि मग असा रंग येतो गाण्याला कीं कांहीं विचारूं नका!

* * *

## कीर्तनकार



ते पाहा! कोण येत आहेत समोरून? डोक्यावर लालभडक झिरमिळ्याची पगडी आहे; अंगांत पांढरा शुभ्र अंगरखा आहे; अंगावर करवती कांठी उपरणें असून धोतर नेसले आहेत ते. कपाळीं बुक्का लावलेला दिसत आहे. हे कीर्तनकार बरं का! कथेचा पूर्वरंग संपल्यावर ते रसाळ आख्यान लावतात! उत्कृष्ट पाठान्तर आहे यांचें! तुकोबांचे अभंग, ज्ञानोबांच्या ओव्या, मोरोपंतांच्या आर्या आणि वामनाचे श्लोक सारे मुखोद्गत!

* * *

## शिल्पकार



देवालयांतल्या मूर्ति, पुतळे कशाचे असतात? ते संगमरवरी दगडाचे, ओतीव धातूचे असतात. दगडांतून मूर्ति कोरून काढणारे हे कारागीर पाहा. यांना शिल्पकार म्हणतात. टाकीचे घाव घलून दगडाला ते देवपण आणून देतात.

* * *

अनुक्रम
9313/1480



## फोटोग्राफर



तुमच्या घरांतल्या भिंतींकडे पाहा बरें! एखादा तरी फोटो लटकत असेल तिथें! हा फोटो काढणाऱ्या कलावंत माणसाचें नांव—फोटोग्राफर! त्याच्या स्टुडिओंत जा आणि चुटदिशीं आपला फोटो ते काढतील तो पाहा! त्यांच्याजवळ कॅमेरा असतो, त्यानें ते तुमचा फोटो काढतील. आपलेंच रूप आपल्या हातांत हे देतात. किती निरनिराळ्या तऱ्हांचे आणि लहानमोठे साधे, रंगीत फोटो हे काढतात! फोटो म्हणजे आपलें कायमचें स्मारक! सभा, लग्नसमारंभ, इत्यादि प्रसंगीं अनेक माणसांचे फोटो ते कौशल्यानें काढतात.

* * *

## फ्रेममेकर



हो! फोटो काढलांत, चित्र आणलेंत, पण तें योग्य ठिकाणीं तुम्ही कसें लावणार? कांचेच्या आंत, चौकटींत नको कां ते बसवून घ्यायला? हें सारें काम फ्रेममेकर करतात. हें पाहा त्यांचें दुकान! अबब! किती तरी प्रकारच्या या चौकटी आणि चित्रें! चला! आपलाहि फोटो येथेंच फ्रेम करून घेऊं या!

* * *

## सुगंधीवाला



यांच्या दुकानांत कसा सुवास येतो आहे! हे पाहा शेठजी. यांच्या दुकानांत तऱ्हे-तऱ्हेचीं अत्तरें, तेलें, उटणीं, साबण आहेत. दिवाळींत तेलें घेण्यासाठीं यांच्या दुकानांत खूप गर्दी असते.

* * *

## कापडवाला



आज सणाचा दिवस ! नेहमींपेक्षां इथल्या मालकांनीं नवीं नवीं लुगडीं, पातळें, रेशमी व जरीचें कापड खूप आणलें आहे. भाऊबीजेसाठीं ताईला खण घ्यायचा का प्रिंटेड पातळ ? कांहीं-तरी चांगलें घ्या.

* * *

## शिंपी



कापड घेतलें. पण कपडे शिवून देणार शिंपीदादा ! रात्रंदिवस काम चाललेलें आहे यांचें. चला आपण यांच्याकडे कापड देऊं, माप देऊं म्हणजे ते आपणांला कपडे शिवून देतील. पण शिंपीदादा, कपडे वेळेवर शिऊन द्या हं !

* * *

## फटाक्याचा दुकानदार



फट् फट् फटाट् ! यांच्या दुकानापुढें तर फारच गर्दी दिसते आहे. कोणी फटाके मागत आहेत, तर कोणी चंद्रज्योति, चम्मनचिडिया, सुईनळे ! किती तरी प्रकार आहेत इथें उडणाऱ्या दारूचे ! दुकानदारांना तर बोलायला वेळ नाहीं ! सगळ्यांना दारू दिली पाहिजे ना ?

* * *

## फुलवाला माळी



एवढ्या आनंदाच्या दिवसांत फुलें हवींतच ! झेंडूच्या फुलांच्या माळा, गजरे, वेण्या, हार, तुरे करीत माळीदादा बसले आहेत. त्यांच्या दुकानांत फुलांचा घमघमाट सुटला आहे. ताईसाठीं वेणी घ्या, गजरे घ्या, देवासाठीं फुलें घ्या आणि घर शोभवायला फुलमाळा घ्या !

* * *

## वाणीदादा




दिवाळीच्या फराळाच्या सामानाची सगळी सोय यांच्याकडे आहे. रवा आहे, साखर आहे, तूप आहे. नुसतें मागा कीं लगेच वाणी-दादा सगळें सामान बांधून देतील ! ते सगळ्यांशीं किती गोड बोलतात !

* * *

## संपादक



गोड गोड खाणं झाल्यावर गोड गोड गोष्टी वाचायला हव्यात ना ? या घ्या ! निर-निराळ्या मासिकांच्या संपादकांनीं आपल्या मासिकांच्या खास अंकांतून गोष्टींचा गोड मेवा आपल्याला दिला आहे ! हे दिवाळी अंक किती छान छान आहेत !

* * *

## भटजीबुवा




नमस्कार गुरुजी. संध्याकाळींच कुठें? हां हां! लक्ष्मीपूजनाला नाहीं का? वहीपूजन करतांना, धनपूजन करतांना, पूजा सांगायला आणि मंत्र म्हणायला भटजी हवेतच. हे गुरुजी पूजा किती छान सांगतात!

* * *

## खेळण्यांचे दुकानदार



दिवाळीचा किल्ला तर केला, पण खेळणीं कुठलीं आणायचीं! हें पाहा एक दुकान! किती नवीं नवीं खेळणीं आहेत! मावळे आहेत, शिवाजी आहेत, विमानें आहेत! आगगाड्या आहेत! अबब! किती हीं खेळणीं!

* * *

## .... आणि तुम्ही



हेंच गाणें म्हणणार ना?
दिवाळीची मजा।
शाळेला रजा॥
आकाशांत दिवा।
उंच उंच लावा॥
कपडा हवा नवा।
गोड खाऊ खावा॥

* * *

६२३८
बा-वा
अनुक्रम 21.423
विभाग बालवा
क्रमांक ७५५
नों. दि. १३।३।५८

## प्रौढ शिक्षणमाला : नवसाक्षर प्रौढांना उपयुक्त अशीं नवीन प्रकाशनें:—

| | | |
|---|---|---|
| | १ : पुनर्जन्म<br>ले. सौ० माणिक पटवर्धन | ०- ८-० |
| × | २ : मुरारीचें साळगांव<br>ले. ना. ग. गोरे | ०- ८-० |
| | ३ : आपली जिमीन<br>ले. गो. नी. दांडेकर | ०- ८-० |
| | ४ : जागते देव<br>ले. शरच्चंद्र गोखले | ०- ८-० |
| | ५ : चार फरार<br>ले. यदुनाथ थत्ते | ०- ८-० |
| | ६ : हिरापूरचे हजार हात<br>ले. देवळे–जोशी | ०-१०-० |
| | ७ : बिनबियांचें झाड<br>ले. व्यंकटेश माडगूळकर | ०-१०-० |
| × | ८ : गारव्यांतील मुलाखती<br>ले. शरच्चंद्र टोंगो | ०- ८-० |
| × | ९ : रानगांवचा संसार<br>ले. प्रभा परुळेकर | ०- ८-० |
| | १० : जनूकाका<br>ले. वा. रा. सोनार | ०- ८-० |
| × | ११ : गहिना<br>यदुनाथ थत्ते | |
| × | १२ आनंदधाम<br>ले. सुमती पोंक्षे | |
| | १३ पांडा<br>ले. शं. रा. देवळे | ०- ८-० |

IRBK-0106238
IRBK-0106238

× या पुस्तकांना भारत सरकारच्या लोकसाहित्य समितीनें इ. स. १९५४, १९५५ व १९५६ या वर्षी रु. पांचशें प्रत्येकीं असें बक्षीस दिलें आहे. ● या पुस्तकाला एक हजार रुपये बक्षीस दिलें आहे. तसेंच हीं व वरील इतर सर्व पुस्तकें लोकशिक्षण समित्यांच्या कक्षेंतील व इतर ग्रंथालयांनीं विकत घ्यावीत अशी सरकारची शिफारस आहे.



चित्रशाळा प्रकाशन पुणें २.